# कार्यालय

## ग्राम पंचायत हळदगाव

## पंचायत समिती उमरेड जिल्हा परिषद नागपूर

### ई - निविदा सुचना क्रमांक 1 – 2026-27

ई - निविदा सुचना क्रमांक 1 - 2026-27 मध्ये बांधकामाकारीता वार्षिक साहित्य खरेदी करीता जिल्हा परिषद वेबसाईटवर www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | तपशील | दरपत्रक विक्रीचा दिनांक | दरपत्रक स्वीकृतीचा दिनांक | दरपत्रक उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | सन 2026-27 या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत हळदगाव अंतर्गत सामान्य निधी, 15 वा वित आयोग निधी, MGNREGA, जिल्हा वार्षिक योजना, सतरा सामुहिक, मा. लोकप्रतिनिधीनी सुचविलेली कामे 25-15, पाणीपुरवठा निधी, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे ठक्कर बाप्पा व इतर विविध शासकीय योजनेंतर्गत करावयाच्या विकासकामे करण्याकरिता लागणारे बांधकाम साहित्य खरेदी करण्याकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे. | दि.19/05/2026 सकाळी 09.00 वाजतापासून | दि.25/05/2026 दुपारी 03.00 वा. पर्यंत | दि. 26/05/2026 दुपारी 03.00 वा. नंतर |

निवदेतील अटी व शर्ती जि. प. नागपूर च्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

निविदा सादर करण्यासाठी डिजीटल सही अनिवार्य आहे.

# कार्यालय

## ग्राम पंचायत हळदगाव

## पंचायत समिती उमरेड जिल्हा परिषद नागपूर

ई - निविदा सुचना क्रमांक 1 - 2026-27

याद्वारे सर्व अधिकृत साहित्य पुरवठादारास सूचित करण्यात येते की, ग्रामपंचायत **हळदगाव** येथे विविध योजने अंतर्गत बांधकामाकारीता वार्षिक साहित्य खरेदी करण्याकरिता आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याकरिता वार्षिक ई-निविदा मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक पुरवठादारांनी आपले दर सोबतच्या दरपत्रकामध्ये ग्राम पंचायत **हळदगाव** जिल्हा परिषद नागपूर च्या वेबसाईट वर सादर कराव्या. उशिरा आलेल्या निविदेच्या विचार करण्यात येणार नाही.

# अटी व शर्ती

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई - निविदा द्वारा ऑनलाईन पद्धतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदा, नोटीस, प्रसिद्धी, सुचना, शुद्धिपत्रके इत्यादीची माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**सदर कामाच्या निविदा बाबत खालील बाबी आवश्यक राहतील.**

i) पुरवठादार नोंदणी प्रमाणपत्र (फोटो), जी.एस.टी. प्रमाणपत्र, दुकानाचे बिल, प्राप्ती कर ३ वर्ष ( 2023-24, 2024-25, 2025-26) भरलेले असावे पॅन कार्ड स्कॅन कॉपी अपलोड (Upload) करावी लागेल.

ii) निविदा प्रमाणपत्रातील सविस्तर निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती पुरवठादारास बंधनकारक राहतील.

iii) उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणताही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

iv) शासनाचा दरसूची (C.S.R.) च्या दरापेक्षा जास्त दर असल्यास ई-निविदा रद्द करण्यात येईल.

२) ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला लिफाफा क्र. १ (तांत्रिक लिफाफा) www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर कार्यालयात उघडण्यात येईल.

३) मंजूर निविदा धारकाकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करते वेळी ग्राम पंचायतच्या नावे **हळदगाव** येथे देय असलेल्या धनाकर्षाच्या स्वरुपात राष्ट्रीय बँकेचा स्वीकारल्या जाईल.

४) निविदा संदर्भात कोणत्याही मार्गदर्शक सुचना शुद्धिपत्रक अथवा इतर माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

५) सदर कामाच्या तीन योग्य निविदा प्राप्त झाल्याशिवाय निविदा उघडण्यात येणार नाही, मात्र तिसऱ्यांदा एकच निविदा प्राप्त झाल्यास त्या निविदा धारकास निविदा देण्यात येईल किंवा पूर्ण ई-निविदा रद्द करुन त्यात फेरबदल करण्याचा पूर्ण अधिकार ग्रामपंचायत स्वतः कडे राखून ठेवत आहे, याची नोंद घ्यावी.

६) ई-निविदा उघडल्यापासून 3 महिने अथवा काम पूर्ण होई पर्यत ग्राहय राहतील.

७) पुरवठाधारकातर्फे कोणत्याही अटी व शर्ती घालून सादर केलेल्या ई-निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

८) निविदा मंजूर झाल्यास रु. 500/- च्या स्टँप पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

९) ई-निविदा सोबत सत्यप्रती फक्त राजपत्रित अधिका-याकडून साक्षांकित केलेल्या असाव्यात.

१०) ई-निविदा सोबत (ITR) आयकर रिटर्न जोडावे.

११) अनामत रक्कम 10,000/- निविदा मंजूर झाल्यानंतर दुस-या दिवशीच अनामत रक्कम म्हणुन जमा करावी लागेल. अन्यथा दुस-या क्रमांकाचा निविदाधारकाला संधी देऊन त्यांच्याकडून साहित्य खरेदी करण्यात येईल.

१२) साहित्याचे मूल्य हे रॉयल्टी शुक्लासह आणि जी.एस.टी सह असावे. आणि साहित्याचे पेमेंट करते वेळी रॉयल्टी भरल्याचा पावत्या सादर करने आवश्यक राहील. अन्यथा साहित्याचे पेमेंट हे रॉयल्टी कपात करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी

१३) निविदा फॉर्म किंमत 2,000/- रु. चा DD सचिव ग्रामपंचायत **हळदगाव** चा नावे जमा करावे. DD स्कॅन करून ऑनलाईन अपलोड करावी अन्यथा निविदा अपात्र करण्यात येईल. प्रोसेसिंग फी रु. 500/- ऑनलाईन वेगळी भरावी लागेल.

१४) UPLOAD केलेला DD निविदा उघडण्याचा दिनांकाचा 1 दिवसा आधी दि. 25/05/2026 ला दुपारी 5 वा. पर्यंत ग्रा. प. कार्यालयात जमा करावी. DD विहित वेळेस ग्रा. प. कार्यालयात जमा न केल्यास त्यांची निविदा अपात्र करण्यात येईल याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

१५) साहित्याची रक्कम मूल्यांकनानुसार अनुदान प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१६) बिल जि.एस.टी. पेडेट असने आवश्यक आहे. (जि.एस.टी. प्रमाणपत्र सोबत जोडावे. अन्यथा उक्त निविदा रद्द करण्यात येईल.)

१७) मंजूर निविदाधारकास साहित्याचा पुरवठा निविदा ओपन झाल्यानंतर पुरवठा आदेश दिल्यापासून ७ दिवसाचा आत करावे लागेल अन्यथा दुस-या क्रमांकाचा निविदाधारकाकडून साहित्याचा पुरवठा करण्यात येईल.

१८) सदर ई-निविदेत L1 पुरवठा धारकाने साहित्य पुरवठा न केल्यास L2 कडून आणि L2 ने पुरवठा न केल्यास L3 कडून साहित्य पुरवठा करुन घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१९) पुरवठाधारकास रॉयल्टी, जि.एस.टी., अनामत, सेस, व ईतर कपाती शासनाच्या नियमानुसार बंधनकारक आहे. साहित्याचे पेमेंट करतेवेळी 2% GST व 2% TDS नियमानुसार कपात करण्यात येईल.

२०) निविदा धारकांनी निवेदेतील साहित्याचे दर पूर्ण भरावे अन्यथा निवदा रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार ग्रा.प. ला राहील याची निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

२१) कोणतेही कारण नदर्शवता संपूर्ण निविदा रद्द करण्याचा अधिकार ग्रा.प. ला राहील.

२२) निविदा ऑनलाइन प्रकाशित करताना किव्हा उघडताना काही चूक झाल्यास ग्रामपंचायत चा निर्णय अंतिम राहील. कोणताही निविदाधारक आक्षेप घेणार नाही किव्हा त्याचा आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही.

सरपंच
गट ग्रामपंचायत, हळदगाव

ग्रामपंचायत अधिकारी
सचिव/सरपंच
गट ग्रामपंचायत, हळदगांव
ग्रा.प. हळदगाव

Signature Not Verified
Digitally signed by SHAILESH RAJENDRA PATIL
Date: 2026.05.19 11:52:36 IST
Location: Maharashtra-MH